**मे. जयलक्ष्मी कास्टींग अँड अॅलॉइज् प्रा. लि., गट क्र. ७४, ७५, फारोळा व गट क्र. ५३, म्हारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बिलेट/इनगॉट - २२० टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन, एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बार, रॉड्स व फ्लॅट बारस् - १२५ टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन या उत्पादन वाढीच्या आणि ब्राईट बारस् - ७५ टन प्रतिदिन पर्यंतचे प्रस्तावित उत्पादन या प्रस्तावित प्रकल्पाकरीता दि. ०३/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता गट क्र. ७४, ७५, फारोळा व गट क्र. ५३, म्हारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद (कारखान्याचे आवार), महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत.**

मे. जयलक्ष्मी कास्टींग अँड अॅलॉइज् प्रा. लि., गट क्र. ७४, ७५, फारोळा व गट क्र. ५३, म्हारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बिलेट/इनगॉट - २२० टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन, एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बार, रॉड्स व फ्लॅट बारस् - १२५ टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन या उत्पादन वाढीच्या आणि ब्राईट बारस् - ७५ टन प्रतिदिन पर्यंतचे प्रस्तावित उत्पादन या प्रस्तावित प्रकल्पाकरीता दि. ०३/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता गट क्र. ७४, ७५, फारोळा व गट क्र. ५३, म्हारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद (कारखान्याचे आवार), महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. भानुदास पालवे,
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद,
जि. औरंगाबाद.

अध्यक्ष.

२) श्री. अ.ज्ञा. मोहेकर,
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद.

सदस्य.

३) श्री. प्र. द. वानखेडे,
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद.

समन्वयक.

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले अध्यक्ष, सदस्य आणि उपस्थित नागरीक यांची यादी येथे जोडली आहे. म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद येथील श्रीमती. सिमा मांगुळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सदर जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली व 'पर्यावरण' या मराठी शब्दाचा अर्थ विषद केला. नंतर त्यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार ची अधिसूचना क्र. एस.ओ. १५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिसूचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ यातील तरतुदी आणि प्रस्तावित प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन प्रकल्प प्रवर्तकांनी जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्यापासुन ते म.प्र.नि.मंडळाने दि.

०१/०७/२०१९ रोजीच्या दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक दिव्य मराठी (मराठी) या वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण विषयक मंजूरी घेण्यासाठी अवलंबविण्यात येणाऱ्या पध्दतीचे वर्णन केले. सदर अधिसूचनेनुसार काही विशिष्ट प्रकल्पांसाठी जाहीर लोक सुनावणी घेणे बंधकारक आहे आणि मे. जयलक्ष्मी कास्टींग अॅंड अॅलॉइज् प्रा. लि., गट क्र. ७४, ७५, फारोळा व गट क्र. ५३, म्हारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बिलेट/इनगॉट - २२० टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन, एम.एस.स्टेनलेस स्टील व अॅलॉय स्टील बार, रॉड्स व फ्लॅट बारस् - १२५ टन प्रतिदिन ते ७५० टन प्रतिदिन या उत्पादन वाढीच्या आणि ब्राईट बारस् - ७५ टन प्रतिदिन पर्यंतचे प्रस्तावित उत्पादन हा प्रस्तावित प्रकल्प सदर अधिसूचने अंतर्गत मोडतो, ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजूरी लागते,म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोकसुनावणी घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की सभोवतालच्या परिसरातील लोकांना सदर प्रकल्पाची माहिती होणे, प्रकल्पाचा आजुबाजूच्या पर्यावरणावर होणारा परिणाम, पुरविण्यात येणारी नियंत्रण प्रणाली व प्रकल्पाविषयी लोकांची मते जाणून घेणे आाणि त्यांच्या सुचनांचा विचार करणे, इ. हा जाहिर लोक सुनावणी घेण्याचा हेतु आहे. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रर्वतकांना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण हे मराठी या स्थानिक भाषेमध्ये विषद करण्याची विनंती केली.

नंतर प्रकल्प सल्लागार, **श्री. प्रितम कदम**, मे. इन्हायरो रिसोर्सेस, मुंबई यांनी प्रकल्पचा तपशिल, पर्यावरणीय प्रदूषण, योजना, साधने आणि करण्यात येणाऱे नियंत्रण उपाय यांचा समावेश असलेले प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण सुरु केले. त्यांनी सांगितले की, सुरवातीला या कारखान्याने सन २००४ साली सदर प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केले आणि तेव्हा पासून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वेळोवेळी संमतीपत्र घेऊन तो चालु ठेवलेला आहे. आणि सद्या कारखान्याकडे म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र आहे, ज्याची वैधता ही २०२१ पर्यंत आहे. त्यांनी सांगितले की, स्टीलची बाजार मागणी विचारात घेऊन कारखान्याने त्यांचे विस्तारीकरण प्रस्तावित केले आहे.

त्यांनी सांगितले की कारखान्याचे पर्यावरण विषयक सल्लागार, मे. इन्हायरो रिसोर्सेस यांनी अभ्यास करुन सदर प्रकल्पासाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार केलेला आहे, त्यासाठी ही चर्चा चालु आहे, आणि सर्व प्रथम त्यांनी प्रस्तावित प्रकल्प स्थळाची जागा दाखविणारा गुगल नकाशा दाखविला. सदर प्रक्ल्पाची गरज आणि विस्तारीकरणाविषयी विषद करतांना त्यांनी सांगितले की, पायाभुत सुविधा विकासात स्टीलची वाढती मागणी विचारात घेऊन कारखान्याच्या मालकांनी विद्यमान स्टीलचे उत्पादन वाढवून सदर मागणी पुर्ण करण्याचा निर्णय घेतलेला आहे, जेणे करुन स्टीलचे बाजारभाव कमी होतील. मे. जयलक्ष्मी कास्टींग अॅंड अॅलॉईज् प्रा.लि. चे मालक आर्थिक दृष्ट्या स्थिर असल्यामुळे ते सदर प्रकल्प चांगल्या स्थितीत चालवु शकतात व त्याच बरोबर ते पर्यावरणाचे संरक्षण करु शकतात आणि त्या नुसार मे. एन्व्हायरो रिसोर्सेस यांनी इ.आय.ए. अहवाल तयार केलेला आहे. त्यांनी प्रकल्प स्थळाचा गुगल नकाशा, अक्षांश, रेखांश, जवळचे गाव फारोळा, पैठण तालुका हे दाखविणरी स्लाईड दाखविली. त्यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाचे उत्पादन हे फारोळा गावात घेतले जाईल आणि हरीत पट्टा हा म्हारोळा गावातील गट क्र. ५३ येथे विकसीत केला जाईल तसेच फारोळा गावात सुध्दा वृक्षारोपण केले जाईल. त्यांनी प्रकल्प स्थळाच्या १० कि. मी. त्रिज्येच्या क्षेत्रातील अभ्यास क्षेत्राचा स्थळकृतीक नकाशा, जो त्यांनी भारतीय सर्वेक्षण विभागाकडून प्राप्त केला तो दाखविला. आणि सांगितले की १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात कोणतेही संरक्षीत

जंगल नाही, तथापी, सदर भागामध्ये काही लहान राखीव जंगले आहेत, परंतु प्रस्तावित प्रकल्पामुळे ते बाधीत होणार नाहीत.

त्यांनी पुढे सांगितले की सदर प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल हा स्पाँज आयर्न व भंगार (Scrap) आहे जो स्थानिक बाजारातुन उपलब्ध केला जाईल तसेच आयातही केला जाईल. लागणारा इतर कच्चा माल हा आयर्न मँगनीज, सिलिको मँगनीज, निकेल, इ. आहे. त्यांनी प्रकल्पाचा तपशिल दाखविला ज्यामध्ये पार्कींग क्षेत्र हे १० % व शासन नियमानुसार प्रस्तावित हरीत पट्टा विकास या साठी ३३% क्षेत्र असे दर्शविले आहे.

सदर प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेविषयी विशद करतांना, त्यांनी सांगितले की ते एक अतिरीक्त आर्क फरनेस बसविणार आहे, त्यामुळे जैव इंधन किंवा डिझेल हे जास्तीचे लागणार नाही व त्यामुळे घातक वायुंचे उत्सर्जन होणार नाही, आणि इंधन म्हणून पुर्णपणे विज वापरली जाईल त्यामुळे अतिरिक्त जैव इंधन किंवा डिझेल लागणार नाही.

त्यांनी सांगितले की, फारोळा गावातील गट क्र. ७४, ७५ येथे ४३२०० चौ.मी. क्षेत्रावर विस्तारिकरण करण्यात येईल आणि ते ४५००० चौ.मी. क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करतील आणि सदर प्रकल्पाचा मोठा फायदा असा आहे की विद्यमान प्रकल्पामध्ये १६० कामगार नोकरीस आहे व प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४०० व्यक्तींना रोजगार दिला जाईल आणि कारखान्याने जास्तीत जास्त स्थानिक लोकांना रोजगार देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांनी प्रकल्पाचा तपशिल विशद केला आणि सांगितले की, विद्यमान प्रकल्पास लागणारी विज ही १० मे. वॅट आहे आणि विस्तारिकरणानंतर लागणारी एकूण विज ही ३० मे. वॅट असेल, सध्या विद्यमान प्रकल्पामध्ये डी.जी. सेट नाही, परंतु प्रस्तावित प्रकल्पामध्ये १००० के.व्हि.ए. क्षमतेचा एक डी.जी.सेट बसविण्यात येईल, पाण्याची गरज ही १६० घन.मी. प्रतिदिन असेल, परंतु पुर्नवापरानंतर पाण्याची गरज ही १४० घन.मी. प्रतिदिन अशी असेल, व ते कारखान्याच्या शेत तळ्यातुन पाईपलाईनद्वारे घेण्यात येईल, आता सद्या कारखान्याकडे २५ मे. टन क्षेमतेचे एक इंडक्शन फरनेस व २० मे.टन क्षेमतेचे एक रि-हीटींग फरनेस आहे आणि उत्पादन वाढीसाठी प्रस्तावित प्रकल्पामध्ये त्यांनी ३० मे.टन. क्षमतेचे एक अतिरिक्त आर्क फरनेस बसविण्याचे प्रस्तावित केलेले आहे, डी. जी. सेट साठी लागणारे इंधन, म्हणजे एच.एस.डी. व रि-हिटींग फरनेस साठी लागणारे इंधन, जसे कोल, फ्युएल आईल, इ. हे स्थानिक बाजारातुन विकत घेतले जाईल, वातावरणात उंचीवर वायु पसरविण्यासाठी कारखान्याने आधिच ३० मीटर उंचीची चिमणी बसविलेली आहे आणि पर्यावरणाचे संरक्षण विचारात घेऊन त्यांनी ४० मीटर उंचीची चिमणी बसविण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

त्यांनी पुढे पर्यावरणाची सद्यस्थिती विशद केली आणि सांगितले की, त्यांनी प्रकल्प क्षेत्रात वेगवेगळया ठिकाणी परिक्षण केले जसे, हवा - ८ स्थळे, भुजल - ८ स्थळे, भुतलावावरील जल - ६ स्थळे, ध्वनी - ८ स्थळे व माती - ८ स्थळे आणि ते खालील प्रमाणे आढळुन आले.

**हवा**:- वेगवेगळया घटकांचे प्रमाण आढळुन आले ते असे सुक्ष्म धुलिकण (**PM१०**)७१.९४ ते ८७.१२ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, अतिसुक्ष्म धुलीकण (**PM२.५**)१९.६५ ते ४१.७४ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, सल्फर डायऑक्साईड (SO2)१८.५८ ते २९.५५ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, नायट्रोजन ऑक्साईड (NOx)३१.५४ ते ४१.७४ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर जे निर्धारित मानकापेक्षा कमी आहेत.

**ध्वनी:-** ध्वनी प्रदूषण पातळी दिसून आली ती अशी - दिवसाचे वेळी - ५१.६ ते ५०.७ dB(A) व रात्रीचे वेळी - ४३.० ते ४१.८ dB(A), जी निर्धारित मानकांच्या खाली आहे.

**भुपृष्टावरील पाणी:-** भुपृष्टावरील पाण्याचे नमुने गोळा करुन त्याचे विश्लेषण केले असता केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाची वर्ग "डी" जल गुणवत्ता मानकाशी तुलना केली असता असे आढळुन आले की सदर पाणी हे औद्योगिक शित करणासाठी व सिंचनासाठी उपयुक्त आहे.

**भुजल:-** भुजलचे नमुने गोळा करुन त्यांची पिण्याचे पाणी मापदंड (IS १०५००) या बरोबर तुलना केली असता सदर पाणी हे पिण्यासाठी योग्य आहे.

**सामाजिक आर्थिक पर्यावरण:-** त्यांनी सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास केला व त्यांना असे आढळुन आले की सदर प्रकपाच्या बांधकाम टप्प्यादरम्यान तसेच बांधकाम पुर्ण झाल्या नंतर रोजगार निर्मीती होईल.

**जैव विविधता:-** त्यांनी प्रकल्प क्षेत्राच्या १० कि.मी. त्रिज्येच्या भागात अभ्यास केला व असे आढळुन आहे की सदर भागामध्ये कोणतीही संवेदनशील प्रजाती नाही आणि प्रस्तावित पकल्पामुळे सदर भागातील जैव विविधतेवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

**श्री. कदम** यांनी पुढे जोखीम मुल्यांकना विषयी विषद केले व सांगितले की त्यांनी जोखीम मुल्यांकन अभ्यास केला व कारखान्यास काही ठराविक सुचना केल्या जेणे करुन कामगारांचे काही नुकसान होऊ नये, कामगारांना वयक्तीक संरक्षण साधणे पुंरविले जातील आणि कामगारांचे कोणत्याही प्रकारचे नुकसाह होऊ नये याची काळजी घेतल्या जाईल.

त्यांनी सांगितले की त्यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार केलेली आहे, त्यामध्ये सदर भागात ज्या मोठया बाबी ओळखण्यात आल्या, त्या पर्यावरण, जल पर्यावरण व घन कचरा व्यवस्थापन या होत्या. वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी त्यांनी ४० मीटर उंचीच्या चिमणीची तरतुद केलेली आहे, धुळीचे उत्र्सजन नियंत्रित करण्यासाठी लोडींग-अनलोडींग भागात पाणी फवारणी यंत्रणा बसविण्यात येईल. आणि त्यांनी विद्युत चलीत आर्क फरनेस प्रस्तावित केल्या मुळे उत्पादन निर्मीतीसाठी कोणत्याही अतिरिक्त जैव इंधनाचा वापर केला जाणार नाही. घरगुती सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी त्यांनी आधिच २५ घन मि. क्षमुतेची घरगुती सांडपाणी सयंत्रणा बसविलेली आहे, ती पुरेशी आहे व अतिरीक्त घरगुती सांडपाणी सयंत्रणा (STP) बसविण्याची गरज नाही. स्टील उद्योगामधून निघणाऱ्या स्लॅगचा चुरा केला जातो व त्यातील लोखंडाचे कण चुंबकीय क्षेत्राद्वारे वेगळे केले जातात आणि उर्वरित पदार्थांचा बांधकामामध्ये वाळु म्हणून वापर केला जातो त्यामुळे घनकचरा विल्हेवाटीची समस्या असणार नाही. ध्वनी प्रदूषण नियंत्रित करण्याकरीता डी.जी. सेटला ध्वनी संलग्नक बसविण्यात येतील, कामगारांना वैयक्तीस संरक्षण साधणे जसे इयर प्लग, इ. पुरविण्यात येतील त्यामुळे त्यांची ऐकण्याची क्षमता कमी होणार नाही आणि कामगारांना कोणताही त्रास होणार नाही.

त्यांनी पुढे पर्यावरण विषयक बाबी विषयी विशद केले आणि सांगितले की कारखान्याने विविध बाबींसाठी जी तरतुद केलेली आहे, ती अशी, हवा पर्यावरण संरक्षण - रु. ९० लाख, जल प्रदूषण नियंत्रण - रु. २० लक्ष, ध्वनी प्रदूषण नियंत्रण - रु. ४ लाख, व्यवसायिक आरोग्य व सुरक्षा - रु. २० लाख, वृक्षारोपण व त्यांचे संरक्षण - रु. ३० लाख, घनकचरा व्यवस्थापन - रु. ६० लाख, रेन वाटर हार्वेस्टींग - रु. १० लाख व आपत्ती व्यवस्थापन योजना - रु. ३० लाख आणि त्या नंतर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण समाप्त केले.

प्रकल्प सल्लागार यांनी सदर प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्रीमती. सीमा मांगुळकर यांनी सांगितले की प्रकल्प सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरणाच्या माध्यमातुन प्रकल्प स्थळ, प्रकल्पाचा उद्देश, निर्माण होणारा रोजगार, सामाजिक – आर्थिक प्रगती आणि प्रदूषण नियंत्रण साधणे, इ. बाबत माहिती दिली. त्यांनी विकास आणि पर्यावरण यातील संबंधाविषयी विषद केले आणि सार्वजनिक सहभागींना विनंती केली की प्रस्तावित प्रकल्पाविषयी जर कुणाला काही शंका, आक्षेप, सुचना, इ. असतील तर ते स्वत:चे नाव सांगुन व्यक्त करु शकतात आणि ते प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार स्पष्ट करतील.

जाहीर लोक सुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागी आणि समिती सदस्य यांनी सदर प्रकल्पा संबंधीत काही प्रश्न उपस्थित केले व प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार व समिती सदस्य यांनी त्यांची उत्तरे दिली, ते खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री. सिताराम शंकरराव- धरपळे**, जवळचे गाव फारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी सांगितले की त्यांची शेतजमीन सदर कारखान्याच्या मागे आहे, १४ वर्षा पासुन सदर कारखान्यातुन निघणारे सांडपाणी कारखान्यापासुन ३. कि.मी. अंतरावर असलेल्या म्हारोळा गावातील गट क्र. ५३ येथे सोडल्या जाते. त्यांनी सांगितले की त्यांनी तक्रार केली, १० वर्षे त्यांची जमीन खराब झाली. सुरुवातीला कारखान्याकडे स्लॅगची विल्हेवाट लावण्यासाठी जागा नव्हती आणि आता सध्या स्लॅगच्या ५० ट्रीप्स् त्यांच्या शेतजमिनीत टाकलेल्या आहेत, कारखान्यातील धुळ मोसंबीच्या झाडांवर साठल्यामुळे त्यांच्या मोसंबीचे नुकसान होत आहे, त्यांनी सांगितले की सदर भागातील एकाही शेतकऱ्यास सुनावणीसाठी बोलावले नाही, म्हणून वरील बाबींचा व प्रदूषणाचा विचार करुन पुढील पाऊल उचलावे अशी त्यांनी विनंती केली.

२) **श्री. अंताराम अंबादास धरपळे**, जवळचे गांव फारोळा, ता. पैठण, जि. ओरंगाबाद येथील रहिवाशी यांनी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये कामगारासाठी केलेले व्यवस्थापन व तरतुद याविषयी विचारले आणि सदर प्रकल्पामध्ये स्थानिक युवकांसाठी रोजगाराकरीता तपशिलवार टक्केवारी स्पष्ट करावी अशी विनंती केली. **श्री. पंकज अग्रवाल**, प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की विद्यमान प्रकल्पामध्ये त्यांनी ६७% स्थानिक लोकांना रोजगार दिलेला आहे आणि प्रस्तावित प्रकल्पामध्ये ८५ ते ९०% स्थानिक लोकांना रोजगार देण्यात येईल, त्यावर जाहीर लोकसुनावणीस उपस्थित असलेल्या लोकांनी आनंदाने टाळ्या वाजविल्या.

३) **श्री. भानुदास पालवे,** अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी आधिच्या प्रश्नाविषयी विचारले, त्यावर **श्री. पंकज अग्रवाल** त्यांनी **श्री. सिताराम धरपळे** यांनी सांडपाणी विल्हेवाटी विषयी विचारलेला प्रश्न स्पष्ट करुन सांगितले की त्यांनी त्यासाठी आधिच चार वर्षापुर्वी आवश्यक ती व्यवस्था केलेली आहे आणि त्यांच्या कारखान्यातुन निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्यांनी सांडपाण प्रक्रिया सयंत्रणा सुध्दा बसविलेली आहे व त्यासाठी आवश्यक ती काळजी घेतलेली आहे. त्यांनी असे सुध्दा सांगितले की, जर अजुनही काही समस्या असतील तर ते पुन्हा पाहील्या जाईल. **श्री. धरपळे** यांनी सुनावणीसाठी बोलाविण्यात आलेल्या सदर भागातील शेतकरी व शासकीय अधिकारी यांच्या संख्येबाबत विचारल्या नंतर, **श्री. पंकज अग्रवाल** यांनी सांगितले की, त्यांनी कुणालाही बोलाविलेले नाही. म.प्र.नि.मंडळाने जाहीर लोक सुनावणीसाठी वर्तमानपत्रात जाहीरात दिलेली आहे. **श्री. धरपळे** यांनी सांगितले की तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, इ. असे कोणतेही शासकीय अधिकारी जाहीर लोकसुनावणीस उपस्थित नाहीत, त्यावर **श्री. पालवे** यांनी सांगितले की ते स्वत: उपस्थित आहेत आणि **श्री. धरपळे** यांना त्यांचा प्रश्न व तलाठी यांना बोलावण्या मागची भुमीका स्पष्ट करण्याविषयी विचारले. या चर्चेमध्ये **श्री. धरपळे** यांनी सांगितले की त्यांच्या गावामध्ये अशा प्रकरचे १०० कारखाने उभारु दया व त्यांच्या गावाचा विकास होऊ दया, वैगेरे आणि विचारले की कारखाना उभारल्या पासून आजर्पंत लागणाऱ्या पाण्यावर कारखन्याने किती पैसे खर्च केले ? त्यांच्या गावामध्ये कारखान्याने एखादा बंधारा बांधला काय किंवा नदी खोदली काय व त्यांची काय योजना आहे? **श्री. पालवे** यांनी त्यांना विचारले की ते सी.एस.आर. बद्दल बोलत आहेत काय, परंतु श्री. धरपळे म्हणाले नाही, ते सी.एस.आर. बद्दल बोलत नाहीत व प्रदूषण नियंत्रणासाठी कोणत्या जागेवर झाडे लावलीत असे त्यांनी विचारले. **श्री. पालवे** यांनी स्पष्ट केले की तलाठी हे तांत्रिक अधिकारी नाहीत, दुसरी बाब ही कारखान्यातुन निघणाऱ्या सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण व सदर कारखान्याच्या वायु प्रदूषणामुळे **श्री. धरपळे** यांच्या झाडांना फळे येत नाही या बाबत आहे आणि सांगितले की प्रदूषणाच्या बाबतीत ठरविण्यासाठी अधिकृत अधिकारी हे म.प्र.नि.मंडळाचे आहेत व ते येथे उपस्थित आहेत व झाडांना फळे न येण्याच्याबाबतीत कृषी अधिकारी सांगू शकतात. तलाठी फक्त सद्यस्थिती सांगु शकातात, जसे झाडांची संख्या, अभे असलेली झाडे, वैगेरे, परंतु ते त्याचं निदान करु शकत नाही. श्री. धरपळे यांनी विचारले, कोण निदान करतील? **श्री. पालवे** यांनी सांगितले की दोन्ही व्यक्ती डायसवर त्यांच्या बाजुला येथे बसलेल्या आहेत व तिसरी व्यक्ती ही कृषी अधिकारी आहे जे निदान करतील. **श्री. धरपळे** यांनी सांगितले की कृषी अधिकारी सुध्दा उपस्थित नाही, त्यावर श्री. पालवे यांनी सांगितले की ते या ठिकाणी पंचनामा करण्यासाठी आलेले नाहीत, तथापि, **श्री. धरपळे** यांची सुचना विचारात घेतल्या जाईल व कार्यवाहीमध्ये समाविष्ट केल्या जाईल, आणि म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी या बाबत उत्तर देतील. नियमानुसार जाहीर लोक सुनावणी संबंधीत अधिकारी उपस्थित आहेत, असे सुध्दा त्यांनी सांगितले. **श्री. अ.ज्ञा.मोहेकर**, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा समिती सदस्य यांनी कारखान्याने सांडपाण्याचा एक थेंब देखील कारखान्याच्या आवारा बाहेर सोडल्या जाणार नाही याची काळजी घ्यावी असे

सांगितले. **श्री. प्र.द.वानखेडे**, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनवणी समितीचे समन्वयक यांनी सांगितले की संमतीपत्रातील अटी नुसार कारखान्याने वायु प्रदूषण नियंत्रण प्रणाली जसे बॅग फिल्टर व त्यामागे डस्ट कलेक्टर बसविलेली आहे. कारखन्याने त्यांच्या कारखान्यातुन निघणाऱ्या औद्योगिक व घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा देखील बसविलेली आहे, आणि सूचित केले की कारखान्याने प्रक्रिया न करता कोणतेही सांडपाणी कारखान्याच्या आवारा बाहेर सोडू नये.

४) **श्री. मुकेश गंगवाल**, सदस्य, औरंगाबाद जिल्हा पर्यावरण समिती, औरंगाबाद यांनी सदर कारखान्यामध्ये जी वायू प्रदूषण न्यिंत्रण उपकरणे बसविलेली आहेत त्यांचा तपशिल आणि होणाऱ्या वायु उत्सर्जनाचे प्रमाण या विषयी विचारले. **श्री. कदम** यांनी सांगितले की भट्टी चार्ज करते वेळी धूर/वायूचे उत्सर्जन होते, त्यासाठी त्यांनी सक्शन हुड बसविलेले आहे, त्यामधुन सदर वायु मल्टी सायक्लोन मध्ये घेतला जातो व नंतर बॅग फिल्टर मधुन स्वच्छ झाल्यानंतर त्याचे सुक्ष्म कण चिमणीद्वारे वातावरणात उंचीवर पसरविले जातात जेणे करुन ते खाली येवू नये. **श्री. गंगवाल** यांनी बॅग फिल्टरचे प्रकार व आयुष्यमान या विषयी विचारले, त्यावर **श्री. कदम** यांनी सांगितले की विद्यमान कारखान्यात त्यांनी पल्स जेट बॅग फिल्टर बसविलेले आहेत व प्रस्तावित प्रकल्पामध्येही त्याच प्रकारचे बॅग फिल्टर बसविण्यात येतील. बॅग फिल्टरच्या आयुष्यमानाच्या संबंधाने **श्री. कदम** यांनी सांगितले की काही वेळा बॅग फाटने, प्रेशर ड्रॉप, इ. सारखे भौतिक गुणधर्म असतात, त्याकरिता सेन्सर्स बसविले जातील, इ. एच.एस.योजना विकसित केल्या जाईल ज्या द्वारे मासिक देखरेख केल्या जाईल व साधणांमध्ये बिघाड होणार नाही याची काळजी घेतल्या जाईल. सदर प्रकल्पाबाबत जर कुणाकडे काही तक्रारी, सुचना प्राप्त झाल्या असतील तर त्या त्यांच्याकडे दिल्या जाऊ शकतात व ते त्या तक्रार, सुचना म.प्र.नि.मंडळाकडे देतील असे **श्री. गंगवाल** यांनी सार्वजनिक सहभागींना सुचविले.

**श्रीमती मांगुळकर** यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली की अजुन कुणाला काही शंका असतील तर ते न भिता व्यक्त करु शकतात.

५) **श्री. संतोष जाधव**, जवळचे गांव फारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पास लागणारा कच्चा माल कोठून आणला जाईल असे विचारले. **श्री. कदम** यांनी सांगितले की लागणारा कच्चा माल हा मुख्यत: भंगार व स्पाँज आयर्न आहे व तो स्थानिक बाजार पेठेतून आणला जाईल व त्याची वाहतुक प्रकल्प स्थळावर रस्त्याने केली जाईल.

६) **श्री. प्रताप धरपळे**, जवळचे गांव फारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद येथील रहिवाशी त्यांनी सदर प्रकल्पासाठी मजूर उपलब्ध करण्या विषयी विचारले. **श्री. कदम** यांनी सांगितले की प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये साधारणत: ४०० लोकांना रोजगार दिल्या जाईल आणि प्रकल्प प्रवर्तकांनी आधि सांगितल्या प्रमाणे साधारणत: ९०% स्थानिक लोकांना प्राधान्य दिल्या जाईल.

७) **श्री. बारवाल**, जवळेच गांव फारोळा, ता. पैठण, जि.औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी सांगितले की प्रदूषणाच्या समस्यांमुळे त्यांना त्रास होतो, म्हणून त्यांच्या गावामध्ये वृक्षारोपणसाठी झाडे ही झाड रक्षक (Tree Guard) सहीत द्यावीत, रस्त्याच्या कडेला जी वाहने येतात त्यामुळे अपघात होतात, त्या करिता वाहनांच्या पार्किंगसाठी पर्यायी व्यवस्था करावी आणि गरीब लोकांचा त्रास टाळण्यासाठी त्यांच्या गावात एक दवाखाना उपलब्ध करुन द्यावा असे त्यांनी सुचविले. **श्री. पंकज अग्रवाल** यांनी सांगितले की सी.एस.आर. अंतर्गत त्यांनी गावातील शाळेत वाटर कुलर व गावकऱ्यांसाठी पाण्याची टाकी पुरविण्यात आलेली आहे, परंतु **श्री. बारवाल** यांनी सांगितले की मागील चार वर्षापासून सदर आर.ओ. प्लॉंट बंद आहे व शाळेतील विद्यार्थांसाठी पाण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, त्यावर **श्री. अग्रवाल** यांनी सांगितले की त्याची वार्षिक देखभाल ही योजनेमध्ये समाविष्ट केलेली आहे व कारखान्याने ते यावर्षी केलेले आहे. **श्री. बारवाल** यांनी त्यांच्यागावातील झाडांना झाड रक्षक (Tree Guard) पुरविण्यासाठी सहभाग घ्यावा अशी विनंती केली. श्री. अग्रवाल यांनी ते मान्य केले आणि सांगितले की त्यांनी आधिच गट क्र. ५३ जे जास्त लांब/दूर नाही येथील १८ एकर क्षेत्रावर हरित पट्टा विकसीत करण्याचे प्रस्तावित केलेल आहे. श्री. बारवाल यांनी येथे सुध्दा झाडे लावण्याचे सूचविले व प्रकल्प प्रवर्तकांनी ते मान्य केले. **श्री. बारवाल** यांनी सदर कारखान्यामुळे त्यांच्या गावात होणाऱ्या वायु प्रदूषणाच्या समस्यांबाबत निदर्शनास आणून दिले (जसे जास्त प्रमाणात धूर पसरल्यामुळे व्यवस्थीत न दिसणे), त्यावर **श्री. अग्रवाल** यांनी सांगितले की सदर तक्रार ही विचारात घेतल्या जाईल. **श्री. बारवाल** यांनी सांगितले की कारखान्याची वाहने रस्त्याच्या कडेला येतात त्यामुळे अपघात होतात, त्यावर **श्री. अग्रवाल** यांनी सांगितले की त्यांनी प्रस्तावित प्रकल्पामध्ये पार्किंगसाठी १०% क्षेत्र राखून ठेवलेले आहे, त्यामळे अशा प्रकारची समस्या उद्‌भवणार नाही.

८) **श्री. भानुदास पालवे**, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी श्री. बारवाल यांनी उपस्थित केलेल्या वायु प्रदूषण समस्ये बाबत स्पष्ट करावे असे विचारले. श्री. कदम यांनी स्पष्ट केले की वायु उत्सर्जनाचे स्त्रोत ओळखावे लागते. **श्री. मोहेकर** यांनी ऑनलाईन मॉनीटरींग प्रणाली बसविण्या बाबत सुचविले. त्यावर **श्री. कदम** यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात चिमणी करीता ऑनलाईन मॉनीटरींग प्रणली बसवू शकतात व त्याची माहिती (Data) प्रदर्शीत केल्या जाईल. जेणे करुन लोकांना वायु उत्सर्जनाचे प्रमाण कळेल/माहिती होईल. **श्री. पालवे** यांनी सांगितले की ऑलनाईन मॉनीटरींग प्रणाली बसविल्याने व त्याची माहिती प्रदर्शित केल्या मुळे वायु उत्सर्जन हे अन्य कारखान्याचे असु शकते किंवा १००% सदर काखान्याचे असू शकते किंवा १००% नसु शकते किंवा काही प्रमाणात सदर कारखान्याचे किंवा काही प्रमाणात सदर भागातील अन्य काखान्याचे असू शकते अशी शंका दूर होईल. **श्री. कदम** यांनी सांगितले की त्यांनी ऑनलाईन मॉनीटरींग प्रणाली आधिच प्रस्तावित केलेली आहे. आधि सांगितल्या प्रमाणे श्री. पालवे यांनी सूचविले की स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन सी.एस.आर. कार्यक्रमा अंतर्गत १०% रक्कम खर्च करुन गावकऱ्यांना रोपटे देण्या ऐवजी ३ ते ४ फूट उंचिची झाडे ही झाड रक्षक (Tree Guard) सहित पुरवावेत, व बंधारा बांधावा, आणि ते प्रकल्प प्रवर्तकांनी मान्य केले.

९) **श्री. सिताराम शंकर धरपळे**, जवळचे गांव फारोळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी स्थानिक स्तरावर प्रदूषणाच्या बाबतीत समिती स्थापन करण्यात येईल काय असे विचारले, त्यावर **श्री. मोहेकर** यांनी सांगितले की ग्रामपंचायत स्तरावर तशी समिती स्थापन करणे शक्य नाही, परंतु जिल्हास्तरीय पर्यावरण समिती आधिच अस्तीत्वात आहे, जी प्रदूषणाशी संबंधीत बाबी विचारात घेते व त्यावर उपाय सूचविते. **श्री. धरपळे** यांनी विचारले की जेथे एखादा कारखाना उभारल्या जात आहे अशा ठिकाणचा एखादा सदस्य घेतल्या जाऊ शकतो काय. **श्री. मोहेकर** यांनी सांगितले की नाही, कारण पर्यावरण समितीची एक विशिष्ट प्रकारची रचना असते, सदस्यांची नावे ही मा. अध्यक्ष व मा. पालकमंत्री सुचवितात ज्यामध्ये जिल्हातील सर्व आमदार, काही शासकीय अधिकारी हे सदस्य असतात, अशा समितीची स्थापना ही पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जारी केलेल्या शासन निर्यणानुसार केली जाते.

१०) **श्री. प्र.द.वानखेडे**, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनवणी समितीचे समन्वयक यांनी विज व पाणी बचती विषयी काही प्रस्तात आहे काय असे विचारले. **श्री. पंकज अग्रवाल** यांनी सांगितले की सोलार एनर्जी आहे, परंतु ती त्यांची मागणी पुर्ण करु शकत नाही. **श्री. वानखेडे** यांनी ती उत्पादना ऐवजी घरगुती हेतु साठी वापरण्यात येऊ शकेल काय असे विचारले **श्री. अग्रवाल** यांनी सांगितले की सोलार एनर्जी ही रस्त्यावरील लाईटसाठी वापरण्यात येईल. **श्री. वानखेडे** यांनी पुढे रेन वॉटर हार्वेस्टींग विषयी विचारले, त्यावर श्री. अग्रवाल यांनी सांगितले की त्यांनी आधीच रेन वॉटर हार्वेस्टींग प्रस्तावित केलेले आहे व ते पुर्ण करण्यात येईल.

**श्रीमती.सिमा मांगूळकर** यांनी सदर प्रकल्पा बाबत अजुन कुणाला काही शंका आहेत काया असे पुन्हा विचारले, परंतु लोकांनी ज्या शंका, प्रश्न, इ. व्यक्त केले त्याचे निरसन झाले असे वाटते. त्यांनी सांगितले की जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त ज्यामध्ये लोकांची निवेदने, सुचना, आक्षेप, इ. चा समावेश करुन तयार केले जाते आणि पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर केले जाते. त्यांनी सांगितले की **एच. मधुबाबू**, रुरल एन्वायरोमेंट एज्युकेशन अँड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, हैद्राबाद यांच्या कडून इ-मेल द्वारे मे. जयलक्ष्मी कास्टींग अॅंड अॅलॉईज प्रा.लि. यांच्या आजच्या लोक सुनावणी विषयी एक सुचना प्राप्त झालेली आहे, ज्यामध्ये जवळपासच्या शेत जमिनीतील पिकांचा तपशिल घेणे, रेन वॉटर हार्वेस्टींग करुन १६६ घन मिटर प्रतिदिन असलेली पाण्याची गरज कमी करणे, सभोवतालच्या भागातील लोकांना उत्साहीत करणे व त्यांना आवश्यक ती सुविधा देणे, जवळपासच्या लोकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरविणे, सी.एॅस.आर. बजेटचा उपयोग करुन गावकऱ्यां बरोबर एक समन्वय समिती स्थापन करणे व अशा प्रकारे गावकऱ्यांना मदत करणे आणि पर्यावरणाची काळजी घेणे, इ. सुचना केल्या. नंतर श्रीमती. मांगुळकर यांनी अध्यक्षांना सदर जाहीर लोक सुनावणी समाप्त करण्याची विनंती केली.

**श्री. भानुदास पालवे**, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी इ-मेलद्वारे आलेल्या निवेदनाच्या जाहीर लोक सुनावणीच्या इतिवृत्तामध्ये समावेश करावा, त्या बद्दल लोकांना सांगावे आणि शक्य तितक्या सुचनांचा विचार करावा असे

सुचविले. त्यांनी सांगितले की वास्तविक एक महिना अगोदर जाहीर लोक सुनावणीची नोटीस ही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द केल्या जाते व सदर नोटीस ही स्थानिक भागामध्ये देखील लावली जाते. त्यांनी पुढे सांगितले की सदर कारखान्याच्या प्रस्तावित विस्तारीकरणा बाबतची माहिती लोकांना असायला /व्हायला पाहिजे, आणि फक्त हेच नाही तर काही अपेक्षा असतात जसे विकास हा पर्यावरण पूरक असायला पाहिजे आणि ह्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाची काही मार्गदर्शक तत्वे आहेत व जाहीर लोकसुनावणी ही भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आयोजित केली जाते जेणे करुन प्रस्तावित प्रकल्प, त्याचे विस्तारीकरण, निर्मित होणारे उत्पादन, लागणारा कच्चा माल, मनुष्यबळ आणि त्या अनुषंगाने वायु प्रदूषण , जल प्रदूषण व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना, इ. लोकांना माहित असायला पाहिजे हा शासनाचा उद्देश असतो. त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्प सल्लागारांनी त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सादरीकरण केले व सार्वजनिक सहभागींना पुरेशी संधी देण्यात आली. त्यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली की त्यांच्या शंकेचे निरसन होईपर्यंत मनात शंका ठेवुन कुणीही जाऊ नये आणि त्यांनी सांगितले की फक्त लोकच नाहीत तर सदर प्रकल्पसंबंधीत बाबी हाताळ्यासाठी महाराष्ट औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कृषी विभाग, महसूल विभाग देखील असतील. त्यांनी कारखाना व्यवस्थापनास युचना केल्या की सार्वजनिक सहभागींनी केलेल्या सुचना त्यांच्या स्तरावर विचारात घेण्यात येतील, आणि कारखान्याचे तांत्रिक अधिकारी, त्यांचे प्रकल्प सल्लागार हे सदर कारखाना त्यांचा प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प, सदर प्रकल्पातुन निघणारा वायु, पाणी, इ. मुळे सभोवतालच्या लोकांना काही त्रास होणार नाही याची काळजी घेतील आणि नंतर त्यांनी सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन जाहिर लोक सुनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(अ.ज्ञा.मोहेकर)
प्रादेशिक अधिकारी तथा समिती सदस्य

(भानुदास पालवे)
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी तथा समिती अध्यक्ष

(प्र.द.वनिखेडे)
उप-प्रादेशिक अधिकारी तथा समिती समन्वयक